**प्रेस नोट**

लाप्र.वि., जळगांव.
दि. १५/०६/२०२६

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, भुसावळ १) विजय विनायकराव गरुड, सहकार अधिकारी (वर्ग-३), २) सुरेश जनार्दन विसपुते, प्रमाणित लेखापरिक्षक व ३) हेमंत प्रकाश काळे, प्रमाणित लेखापरिक्षक यांच्याविरुध्द यशस्वी सापळा कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | जळगांव |
| फिर्यादी | श्री हेमंत खंडु नागरे , पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक व कलम | बाजारपेठ पोलीस स्टेशन, जि.जळगाव गुरनं ३१६/२०२६, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव | **१) विजय विनाकराव गरुड, सहकार अधिकारी रा.धुळे (वर्ग-३)**<br>**२) सुरेश जनार्दन विसपुते वय ६२ वर्षे धंदा व्यवसाय, प्रमाणित लेखापरिक्षक, रा.माऊलीनगर, रेणुका माता मंदिराजवळ, राजस्थान मार्बलच्या मागे, भुसावळ जि.जळगांव**<br>**३) हेमंत प्रकाश काळे, वय ४० वर्षे धंदा व्यवसाय प्रमाणित लेखापरिक्षक रा ६१, विवेकानंद नगर, जिल्हापेठ, जळगांव** |
| लाचेची मागणी रक्कम | ३०,०००/- रुपये. |
| स्विकारलेली रक्कम | ३०,०००/- रु. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे भुसावळ येथील रहिवासी असून त्यांना सावकारी व्यवसायासाठी सावकारी परवाना काढावयाचा होता. त्याकरिता दिनांक ३०/०३/२०२६ रोजी तक्रारदार यांनी भुसावळ येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, भुसावळ येथे जावुन लेखी अर्ज दिला होता. तक्रारदार यांना सदर कार्यालयातील श्री. गरुड, सहकार अधिकारी यांनी सावकारी परवाना काढुन देण्याच्या मोबदल्यात २०,०००/- रुपयांची लाचेची मागणी करुन, ऑडिटर श्री. विसपुते यांना भेटण्यास सांगितले. त्याबाबत तक्रारदार यांनी आलोसे विजय विनायकराव गरुड व सुरेश जनार्दन विसपुते, प्रमाणित लेखापरीक्षक (खाजगी इसम) यांचेविरुद्ध दि. २३.०४.२०२६ रोजी ला.प्र.वि., जळगाव यांच्याकडे तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करण्यात आली त्या दरम्यान आरोपी सुरेश विसपुते यांनी तक्रारदार यांना सावकारीचा परवाना काढून देण्याच्या मोबदल्यात लोकसेवक श्री. गरुड यांच्यासाठी, स्वत:साठी तसेच हेमंत काळे, प्रमाणित लेखापरीक्षक (खाजगी इसम) यांचेसाठी एकूण ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केली.<br>त्याप्रमाणे दि.१५.०६.२०२६ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान भुसावळ शहरातील नाहाटा चौफुली परिसरात आरोपी सुरेश विसपुते यांनी आरोपी श्री. हेमंत काळे यांच्याशी फोनवरुन बोलणे करुन दिल्यावर श्री. हेमंत काळे यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर आरोपी सुरेश विसपुते यांनी ३०,०००/- रु. लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष स्वत: स्वीकारली व लाच रक्कमेतील ५,०००/-रु आलोसे श्री. गरुड, सहकार अधिकारी यांच्या मागणीप्रमाणे त्यांना फोन पे द्वारे पाठविली म्हणुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| सापळा कारवाई | **पर्यवेक्षण व सापळा अधिकारी** - श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव,<br>**सापळा पथक** - श्रीमती रेश्मा अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,नंदुबार कॅम्प, जळगांव, श्रेणी पोउनि/दिनेशसिंग पाटील, श्रेणी पोउनि/सुरेश पाटील, पोहेकॉ/ किशोर महाजन, पोकॉ/प्रणेश ठाकुर, पोहेकॉ/ बाळु मराठे सर्व नेमणुक ला.प्र.वि. जळगांव.<br>**तपासी अधिकारी** - श्रीमती स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |

| मार्गदर्शन | १) मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |
|---|---|

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव येथे सपंर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | लांचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. |
| संकेतस्थळ | :- | acbmaharastra.gov.in |
| ई-मेल/ऑनलाईन तक्रार | :- | spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com |
| टोल फ्रि क्रमांक | :- | १०६४. |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५७-२२३५४७७. |
| व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक | :- | ७५८८६६१०६४. |

(हेमंत के. नागरे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि.,जळगांव